# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

## नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

## (पोलीस वार्तापत्र)

## सायंकाळ

---

**दिनांक 14.02.2018 गुरूवार**

**(गुन्हे)**

**1) पो.स्टे. शांतीनगर – प्राणांतीक अपघात :**

दि. 14.02.18 चे 1130 वा चे सुमारास फिर्यादी अमोल भाऊरावजी मदनकर, वय 30 वर्ष, रा. बजरंग प्लॉट, मेहर किराणा स्टोर्स जवळ, नागपूर हे गाडी क्र. एमएच/49/के/0569 ने त्यांचा मुलगा अवनिश मदनकर, वय 4 वर्ष, याला गाडीवर बसून जात असतांना पो.स्टे. शांतीनगर हद्दीत इतवारी दही बाजार पुलीया येथे टाटा एस गाडी क्र. एमएच/40/वाय/2332 चा आरोपी चालक जावेंद्र चुन्नीलाल येडे, वय 40 वर्ष, रा. मॉ अंम्बे नगर, पारडी, ठाकुर किराणा स्टोर्स जवळ, नागपूर याने आपल्या ताब्यातील वाहण भरधाव वेगाने व निष्काळजीपणे व हयगयीने चालवून फिर्यादीचे गाडीला मागुन धडक दिल्याने फिर्यादी व त्यांचा मुलगा खाली पडले त्यात फिर्यादीचा मुलगा गंभीर जखमी होवून मरण पावला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. शांतीनगर येथे सपोउपनि सुधीर बघेल, 9579434177 यांनी आरोपी चालकाविरूध्द कलम 279,304(अ) भादंवि अन्वये गुन्हा नोंदवून आरोपीस अटक केली आहे.

**2) पो.स्टे. कळमना – फसवणुक :**

दि. 06.02.18 चे 0922 वा ते दि. 14.02.18 चे 1230 वा दरम्यान पो.स्टे. कळमना हद्दीत नाका नंबर 4 समोर, नागराज नगर, कळमना गाव, नागपूर येथे राहणारे फिर्यादी रमेश हरीशचंद्र उके, वय 32 वर्ष, यांचे फोनवर मोबाईल क्र. 7998470863 चा आरोपी धारकाने त्यांच्या मोबाईल वर फोन करून सिंडीकेट बॅकमधुन बोलतो असे सांगुन फिर्यादीचे मोबाईलवर आलेला मॅसेज चा ओटीपी नंबर विचारून फिर्यादीच्या खात्यातून ऑन लाईन ट्रान्झेक्शन करून एकुण 51,298 रू काढून फिर्यादीची फसवणुक केली. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. कळमना येथे सपोउपनि सुरेंद्र तिवारी, 937166943 यांनी आरोपीविरूध्द कलम 420 भादंवि सहकलम 66(ड) माहीती तंत्रज्ञान कायदा अन्वये गुन्हा नोदंविला आहे.

**3) पो.स्टे. गणेशपेठ – चोरी :**

दि. 08.02.18 चे 1640 वा चे सुमारास फिर्यादी श्रीमती इंदुबाई वसंत राघोते, वय 75 वर्ष, रा. कावरा पेठ, दुर्गा चौक, उमरेड या आपल्या मुलासोबत पो.स्टे. गणेशपेठ हद्दीत मेडीकल चौक ते मध्यवर्ती बस स्थानक दरम्यान ॲटो मध्ये प्रवास करीत असतांना ॲटो मध्ये अगोदर बसलेल्या 3 अनोळखी महीलां पैकी एकीने फिर्यादीचे गळयातील सोन्याची चैन किं, 30,000 रू ची फिर्यादीस नकळत चोरून नेली. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. गणेशपेठ येथे सपोउपनि प्रतापसिंग, 9011050274 यांनी आरोपीविरूध्द कलम 379 भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पो.स्टे. पाचपावली, एमआयडीसी :**

**1) पाचपावली** – दि. 14.02.18 चे 0730 वा चे सुमारास पो.स्टे. पाचपावली हद्दीत लालगंज खैरीपुरा, नागपूर येथे राहणारे दिवाकर पांडुरंग पराते, वय 49 वर्ष, यांनी आपल्या राहते घरी

बाथरूम मध्ये दोरीच्या सहायाने गळफास लावून आत्महत्या केली. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पो. स्टे. पाचपावली येथे पोहवा राजुसिंग, 7020250525 यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे.

2) एमआयडीसी – दि. 14.02.18 चे 1000 वा पुर्वी पो.स्टे. एमआयडीसी हद्यीत प्लॉट नं 7, पालकर लेआउट, राजुनगर, हिंगणा रोड, नागपूर येथे राहणारी कु कोमल गिरजाशंकर तिवारी, वय 17 वर्ष हिने आपल्या राहते घरी बेडरूम मध्ये छताचे बल्लीला ओढणीच्या सहायाने गळफास घेवून आत्महत्या केली. याप्रकरणी फिर्यादी संतोष हनुमान उपाध्याय, वय 50 वर्ष, यांनी दिलेल्या सुचनेवरून पो.स्टे. एमआयडीसी येथे पोहवा सिध्दार्थ, 9765778501 यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे.

## (ईतर)

### 1) आरोपीस न्यायालयातुन झालेली शिक्षा :

1) कोराडी – दि 014.02.2018 रोजी मा. दुसरे अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, श्री डि. अ. जाधव साहेब, यांनी त्यांचे कोर्टाचे केस क्र 2136/11 मधील व पो.स्टे कोराडी येथील अप. क्र. 63/11 कलम 379,34 भादवि मधील आरोपी क्र. 1) राजु तुळशिराम चिमनकर, वय 23 वर्ष, 2) निलेश भाऊराव सधांषू वय 30 वर्ष, रा. इंदोरा, बाराखोली, पो.स्टे.जरीपटका, नागपूर यांचे विरूध्द साक्षी पुरावा अंती गुन्हा शाबीत झाल्याने दोन्ही आरोपींना कलम 379,34 भादवि मध्ये 6 महीने साधा कारावास व 100 रू दंड, दंड न दिल्यास 15 दिवस शिक्षा सुनावली आहे. आरोपींस दिनांक 21.05.2011 चे 0620 वा चे सुमारास अटक केली होती.

दि. 21.05.11 चे 0015 वा चे सुमारास पो.स्टे. कोराडी हद्यीत खसाळा मसाळा संचेती पंप हाऊस जवळ आरोपी क्र 1) राजु तुळशिराम चिमनकर, वय 23 वर्ष, 2) निलेश भाऊराव सधांषू वय 30 वर्ष, रा. इंदोरा, बाराखोली, पो.स्टे.जरीपटका, नागपूर यांनी संगणमत करून एमएसइबी पावर हाऊस येथे ठेवलेले लोखंडी सामाण अंदाजे 200 किलो किंमत 3,000 रू चा मुद्येमाल आपले सायकलवर ठेवून घेवून जात असतांना फिर्यादी प्रफुल पांडुरंग उमरकर, वय 29 वर्ष, यांनी आरोपींना पकडून पो.स्टे.ला आणुन जुन्या सायकली व लोखंडी सामाण अंदाजे 3,900 रू चा मुद्येमला जप्त करण्यात आला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोस्टे कोराडी येथे गुन्हा नोंदविला आहे.

सदर गुन्हयात तपासी अधिकारी पोउपनि सी.आर. पाल, यांनी कोर्टात दोषारोपपत्र सादर केले. सदर गुन्हयात कोर्टात कोर्ट पैरवी अधिकारी पोहवा केशव ठाकरे, रविकीरण भास्करवार, नापोशि जिवनलाल गुप्ता यांनी काम पाहीले. तर सदर खटल्यात सरकारी वकील म्हणून श्रीमती एम.एम. काळवीट मॅडम, यांनी काम पाहीले. तर आरोपीतर्फे ॲड एन.एम. नरवाडे यांनी काम पाहीले.

### 2) पो.स्टे. धंतोली येथील मुद्येमाल गृहातील प्रोव्हीशन मधील मुद्येमाल नष्ट केल्याबाबत :

पो.स्टे. धंतोली नागपूर शहर येथील मुद्येमाल गृहातील प्रोव्हिशन मधील देशी/विदेशी व मोहफुलाची दारू मा. कोर्टाच्या आदेशान्वये निकाली गुन्हयातील दारू मा. कोर्टाचे आदेशाने एकुण 9 गुन्हयातील देशी दारू 1,97,980 लिटर, विदेशी दारू 80,280 लिटर व मोहफुलाची 27 लिटर असा एकुण 1,68,000 किमतीची दारू श्री जी. एन. केंद्रे, दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क अ/1 विभाग नागपूर पो.स्टे. धंतोली येथील मुद्येमाल मोहरर पोउपनि कुंदन वाघमारे, नापोशि शिवदास, पोशि गजानन, वसंता, प्रमोद, विनोद यांनी वपोनि सिमा मेहंदळे यांच्या मार्गदर्शनाखाली नाश करण्यात आली.

### 3) शहरातील नाईट राऊंड अधिकारी बाबत :–

नागपूर शहरात आज दि. 14.02.2018 रोजी मा. पोलीस उप आयुक्त, (परि क्र. 4) श्री. निलेश भरणे, हे नाईट राऊंड करणार आहे.

पोलीस जनसंपर्क अधिकारी
नागपूर शहर